महाराष्ट्र शासन – सार्वजनिक आरोग्य विभाग
राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय,
डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे -४११ ००१

डॉ.मधुकर शि.पवार
उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजिआ)
तथा उपमुख्य निबंधक
(जन्म व मृत्य) महाराष्ट्र राज्य

कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०
मा.सं. विभाग ☎ :- ०२० - २६०५८६१०
फॅक्स क्र. :- ०२० - २६०५८२९२
ई-मेल crs_d83@yahoo.com

**परिपत्रक क्रं.९** जा.क्र.आमाजिआ/कक्ष-८३/कामकाजा बाबत/4160-4235/१५
दिनांकः- 2/6/२०१५

**महत्वाचे/तात्काळ**

प्रति,
जिल्हा शल्य चिकित्सक,
जिल्हा सामान्य रुग्णालय,
.............. (सर्व)

विषय :- जन्म-मृत्यू कार्यक्रम
जिल्हा सामान्य रुग्णालय अंतर्गत सांख्यिकी सहाय्यक यांच्या कामकाजा बाबत.

आरोग्य विभागाअंतर्गत सर्व जिल्हा सामान्य रुग्णालया मध्ये रुग्णालयीन प्रशिक्षण केंद्रां अंतर्गत सांख्यिकी सहाय्यकाचे पद मंजूर आहे. याशिवाय सदर सांख्यिकी सहाय्यकांवर जन्म-मृत्यू कार्यक्रमाची पुढील महत्वाची जबाबदारी सोपविण्यात येत आहे.

१) जिल्हा सामान्य रुग्णालया अंतर्गत होणा-या जिवंत जन्माची स्त्री/पुरुष आकडेवारी अहवाल दरमहा संबंधीतांनी वेळेत पाठविल्याची खात्री करणे व पाठविला नसल्यास प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपूर्वी पाठविला जाईल याची दक्षता घ्यावी.

२) जिल्हा सामान्य रुग्णालयाअंतर्गत सर्व जन्म घटनांचे “जन्म प्रमाणपत्र” संबंधित मातेला रुग्णालय सोडण्यापूर्वी देणे. तसेच जन्म प्रमाणपत्र वाटप आकडेवारीचा अहवाल दरमहा वेळेत सादर करणे.

३) जिल्हा सामान्य रुग्णालया अंतर्गत होणा-या प्रत्येक मृत्यूचे MCCD अहवाल (मृत्यूच्या कारणाचे वैद्यकीय प्रमाणपत्र नमूना क्रं.४ मध्ये) संबंधीत वैद्यकीय अधिका-यांकडून प्राप्त करुन घेऊन दरमहा कार्यालयास सादर करणे.

(कृ.मा.प.)

वरील नमूद अहवाल सोबत जोडलेल्या नमून्यात उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ) कार्यालय, पुणे या कार्यालयास दर महिन्यास ५ तारखे पुर्वी crs_d83@yahoo.com या ई-मेल वर पाठविण्यात यावे. मृत्यूचे कारणाचे वैद्यकीय प्रमाणपत्राच्या मुळ प्रती या कार्यालयास नियीमत सादर करावयाच्या आहेत.

माहे जून २०१५ मध्ये जिल्हा सामान्य रुग्णालया अंतर्गत कार्यरत सांख्यिकी सहाय्यक यांची स्वतंत्र सभा घेण्यात येणार असून वरील कामाचा आढावा घेण्यात येणार आहे याची नोंद घेण्यात यावी.

उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ)
तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यु
महाराष्ट्र राज्य पुणे-१

प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी -
उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळे ............. (सर्व)

प्रत सविनय सादर -
मा. संचालक, आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म-मृत्यु, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१.

प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव -
जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यू, जिल्हा परिषद ...... (सर्व)

२/- आपल्या जिल्हया अंतर्गत जिल्हा सामान्य रुग्णालय यांचे कडील वरील सर्व नमूद मासीक अहवाल वेळेवर सादर केले जातील याची दक्षता घेणेबाबतची सर्वस्वी जबाबदारी आपल्या कार्यालयातील सांख्यिकी अधिकारी तथा जिल्हा नोडल अधिकारी यांच्यावर राहील.